**महाराष्ट्र शासन**

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.**
**क्षेत्रिय कार्यालय : सीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालया समोर, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**
**: सीईटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**

ईमेल: maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट : www.mahacet.org


क्र.राज्यसीईटीकक्ष/ नीट-युजी २०१७/नोटीस क्रमांक १९/१००२/७८ दिनांक:- २७.१०.२०१७

# नीट - युजी - २०१७

## नोटीस

### शासकीय/शासन अनुदानित/ विनाअनुदानित बीएएमएस/ बीयुएमएस/ बीएचएमएस अभ्यासक्रम केंद्रिभूत समुपदेशन प्रवेश प्रक्रिया (Centralised Counselling Round)

सक्षम प्राधिकारी तथा मा.आयुक्त,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे नोटिस क्र.१६, दि.१७.१०.२०१७ नुसार आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी अभ्यासक्रम प्रवेशाची "केंद्रिभूत समुपदेशनाची" प्रवेश प्रक्रीया दि.२३.१०.२०१७ ते दि.२७.१०.२०१७ या कालावधीत रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी जवळील महात्मा गांधी मैदान (जांबोरी मैदान) मुंबई येथे राबविण्यात येत आहे.

उपरोक्त प्रवेशप्रक्रीया संपुष्टात आल्यानंतर देखील काही आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या काही जागा रिक्त राहाण्याची शक्यता आहे. तसेच काही महाविद्यालयांमध्ये नव्याने जागा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या सर्व जागांवर प्रवेश करण्याकरिता केंद्रिभूत समुपदेशनाची प्रवेश प्रक्रीया (Centralised Counselling Round) खाली दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यात येणार आहे. Vacancy Chart will be displayed on dt.28.10.2017 on www.dmer.org and www.mahacet.org

**(A) INTER-SE ROUND FOR ALL CONSTITUTINOAL RESERVATION CANDIDATES :**

| Date | NEET A I R | Time | Category | |
|---|---|---|---|---|
| 30.10.2017 | 01 to 1090064 | 08.00 am onwards | All category i.e. SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, OBC | Inter - se will be held as per Annexure - B (7) of the Brochure NEET UG - 2017 |

**(B) REGULAR ROUND FOR ALL CANDIDATES :**

| Date | NEET A I R | Time | |
|---|---|---|---|
| 30.10.2017 | 01 to 700000 | 01.30 pm onwards | |
| 31.10.2017 | 700001 to 900000 | 09.00 am to 01.30 pm | Round shall be held only if seats are available |
| 31.10.2017 | 900001 to 1090064 | 02.00 pm to 05.00 pm | |

- **स्थळ:- महात्मा गांधी मैदान (जांबोरी मैदान) वरळी, मुंबई** (रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी जवळ).

**उपरोक्त केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेकरिता पात्र विद्यार्थी (Eligible)**

**१) ज्या विद्यार्थ्यांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशाकरिता www.dmer.org या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केलेले आहे.**

२) जे विद्यार्थी कोणत्याही महाविद्यालयात सद्य:स्थितीत प्रवेशीत नाहीत व ज्यांच्याकडे महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यासह (Leaving Certificate) सर्व मुळ प्रमाणपत्र आहेत.
३) ज्या विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश दि.२३.१०.२०१७ पूर्वी रद्द केला आहे.
४) दि.२३ ऑक्टोबर २०१७ पासून सुरु झालेल्या प्रवेशफेरीच्या पूर्वीच्या प्रवेशफेरीत निवड झालेले परंतु महाविद्यालयात प्रवेशासाठी रुजू झालेले नाहीत तसेच ज्यांच्याकडे सर्व मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत.

## उपरोक्त केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेकरिता अपात्र विद्यार्थी (Not Eligible)

( खालील विद्यार्थ्यांनी प्रवेशफेरीस उपस्थित राहू नये.)

१) ज्या विद्यार्थ्यांनी www.dmer.org या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केलेले नाही.
२) ज्या विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश दि.२३.१०.२०१७ रोजी किंवा नंतर रद्द केला आहे.
३) दि.२३ ऑक्टोबर २०१७ पासून सुरु झालेल्या प्रवेशफेरीत निवड झालेले परंतु महाविद्यालयात प्रवेशासाठी रुजू झालेले नाहीत.

## केंद्रिभूत समुपदेशन प्रवेश फेरी ( दि.३०.१०.२०१७ ते दि.३१.१०.२०१७) करिता महत्वपूर्ण सूचना

१) या केंद्रिभूत समुपदेशनाच्या प्रवेशफेरीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः ब्रोशर मध्ये नमूद केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रांसह व त्याच्या दोन छायांकीत प्रतीसह उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी म्हणून कोणालाही उपस्थित रहाता येणार नाही.
२) महाविद्यालयांचे प्रतिनिधी, कॅशिअर या प्रवेश फेरीच्या ठिकाणी उपस्थित राहणार असल्यामुळे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी तात्काळ प्रवेश फी रु.१५००/- फक्त चा Multicity cheque/ Cash द्वारे व उर्वरित शैक्षणिक शुल्क धनाकर्ष / धनादेशा द्वारे अदा करुन व मुळ प्रमाणपत्रे तेव्हाच सादर करुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करायची आहे.
३) आयुष मंत्रालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची परवानगी मिळालेल्या महाविद्यालयांच्या जागा याच फेरीत ज्या दिवशी परवानगी मिळेल तेव्हा पासून विद्यार्थ्यांना उपलब्ध राहतील. मात्र ज्या विद्यार्थ्यांनी अशा जागा उपलब्ध होण्या पुर्वी प्रवेश घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना सदर जागा उपलब्ध होणार नाहीत.
४) विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की त्यांनी रिक्त जागांचा तपशील बघूनच प्रवेश प्रक्रियेला उपस्थित राहावे.
५) www.dmer.org या website वरुन CET CELL नावाचे mobile App download करुन विद्यार्थी व पालकांनी प्रवेश फेरीची वेळोवेळीची अद्ययावत स्थिती (Current Status) पहावी तसेच दररोज प्रवेश फेरी संपल्यावर रिक्त जागांचा तपशील वेबसाईटवर (www.dmer.org) वर वेळोवेळी पहावा.
६) विद्यार्थ्यांनी दि.३०.१०.२०१७ अखेरची रिक्त जागांची स्थिती बघूनच दि.३१.१०.२०१७ रोजी उपस्थित रहाण्याबाबत निर्णय घ्यावा.
७) दि.३१.१०.२०१७ रोजीची फेरी रिक्त जागा उपलब्ध असल्यावरच घेण्यात येईल.

(ए.ई.रायते) भा.प्र.से.
सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,
राज्य सीईटी कक्ष, महाराष्ट्र राज्य